अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
जकात विभाग
दि. ९/११/२०१२.

विषय - संकेत स्थळावर दुरुस्ती करणे बाबत.

सविनय सादर,

विनंती पुर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की , सन २०१२-१३ या वर्षामध्ये पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नेमणेकामी किमान देकार रक्कम रु. १९,९७,६४,३७४ /- निश्चीत करुन त्यानुसार जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यास मा. स्थायी समिती ठराव क्र. ५० दि. ७.११.२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१२-१३ करीता पारगमन शुल्क वसुलीस्तव अभिकर्ता नेमणेकामी जाहिर निविदा सुचना दि. ८.११.२०१२ रोजी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर तसेच स्थानीक , जिल्हास्तरीय , व राज्यस्तरीय वर्तमानपत्रांतुन प्रसिध्दीस दिलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने संकेत स्थळावरुन प्रसिध्दीस दिलेल्या जाहिर निविदा सुचनेच्या पा.क्र. ८ वर नमुद निविदा धारकाकरीता अटी व शर्ती मधील अट क्र. ७ ( ५ ) नुसार नजर चुकीने - किमान देकार रक्कम रु. २८ कोटीपेक्षा कमी देकार रक्कमेची निविदा स्विकारली जाणार नाही अशाबाबत प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

सदर बाबत - किमान देकार रक्कम रु.२८ कोटी ऐवजी रु. १९,९७,६४,३९४ /- ( रुपये एकोणीस कोटी सत्यान्नव लाख चौसष्ठ हजार तीनशे चौ-यान्नव मात्र ) या पेक्षा कमी देकार रक्कमेची निविदा स्विकारली जाणार नाही अशाबाबत संकेत स्थळावर दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

तरी सदर बाबत मान्यतेस्तव व आदेशार्थ सविनय सादर ,

मा. उपायुक्त सो.

जकात अधिक्षक
९/११/१२
अहमदनगर महानगरपालिका.

प्रस्तावानुसार निविदापत्रकामध्ये दुरुस्ती करणेस योग्य. तथापि मा. आयुक्त सादर
९/११

मा. आयुक्त

९/११/१२